सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५५४

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.१४० दि.२०/१२/२०१९ च्या मान्यतेने महापालिकेच्या मार्केट लायसन्स विभागाकडील लायसन्स दरामध्ये फी वाढ सन २०१४ नंतर एकदम पाच वर्षानी केली असलेने, सदरची झालेली फी दरवाढ जादाची असून, ती मान्य नसलेने महापालिका क्षेत्रातील बहुतांश व्यावसायीकांनी आपले लायसन्स परवाना नुतनीकरण करुन घेतलेला नाही व व्यवसायीकांनी फी दरवाढ कमी करणेची मागणी केलेली होती. तथापि, झालेली दरवाढ कमी करता येणार नसलेचे प्रशासनाने सांगितलेने व्यावसायीकांनी मागील दंड व व्याज माफ करणेची मागणी केलेली आहे व दंड व्याज माफ केलेस नुतनीकरण करुन घेणेची तयारी दर्शविली आहे.

सन २०१९ मध्ये कृष्णा नदीस आलेला महापुर सन २०२०-२१ मधील कोवीड-१९ महामारी यामुळे व्यवसायीकांचे झालेले नुकसान याचा विचार करुन तसेच दंड व व्याज माफ करणेची सवलत दिल्यास महापालिकेच्या मार्केट लायसन्सच्या थकबाकी वसुल मोठ्या प्रमाणात होणार असलेने, महापालिका क्षेत्रातील सर्व व्यावसायीकांना त्यांचे मार्केट लायसन्स नुतनीकरण थकबाकी वरील १००% दंड व व्याज माफ करणेस ही सभा मान्यता देत असून, सदर दंड व व्याज माफीची मुदत दि.३१ आक्टोंबर २०२३ राहील असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Nimbalkar सौ. वर्षा निंबाळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] श्री. संतोष पाटील. D.P. Suryavanshi महापौर,

वि.मा.अ.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५५५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/०५/२०२३ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजनेतून सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेला एकूण र.रु.१,७७,५५,८८४/- मात्र निधी मंजूर करण्यात आला असून, सदर मंजूर निधीतून कामे निश्चित करुन, सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारीसो,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्यांनी त्यांच्या प्रभागातील विकास कामे होणेसाठी केलेली मागणी विचारात घेता, महानगरपालिका क्षेत्रातील विविध कामांचा खालील नमुद अ.क्र.०१ ते १६ कामांचा एकूण र.रु.२,५७,८३,१००/- मात्रचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली कडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	र.रु.
१.	मिरज वार्ड क्र.४ मधील मालगाव रोड इंदिरानगर येथील मुख्य रस्ता डांबरीकरण करणे.	२००००००
२.	मिरज वार्ड क्र.५ मधील भीम नगर श्रीरंग कांबळे घर ते उत्तम कांबळे घर रस्ता सुधारणा करणे.	१५०००००
३.	मिरज वार्ड क्र.५ मधील भीम नगर गंगाराम कांबळे घरासमोरील रस्ता सुधारणा करणे	१०००००
४.	सांगलीवॉर्ड क्र.१७ क मधील भूमापन क्रमांक ७१/१, ७१/२ व ७१/३ मनपा ओपन स्पेस विकसीत करणे	३०००००
५.	सांगलीवॉर्ड क्र.१७ क मधील माळी चित्रमंदिर ते १०० फूटी पर्यंत रस्ता करणे.	२२०००००
६.	मिरज वार्ड क्र.६ मधील सिंदगी घर ते अमन चौक पर्यंत ट्रिमिक्स रस्ता करणे.	२५०००००
७.	सांगली वार्ड क्र.९ मधील धोत्रे आबा झोपडपट्टी येथील मनपा ओपन स्पेस विकसित करणे.	२०००००
८.	सांगली वार्ड क्र.९ मधील अहिल्यादेवी हौसिंग सोसायटी मनपा ओपन स्पेस मधील विठ्ठल मंदिर सभा मंडप बांधणे.	२०००००
९.	सांगली वार्ड क्र.१२मधील जामवाडी अंतर्गत रस्ते करणे.	३०००००
१०.	कुपवाड शहरातील यशवंतनगर येथील वसंतदादा कुस्ती केंद्र परिसरातील स.नं.१२७९ मनपा ओपन स्पेस विकसित करणे.	१५०००००
११.	सांगली वार्ड क्र.१६ मधील खणभाग येथील भारत चौक परिसर व जय भवानी रोड परिसर येथील दक्षिण उत्तर पूर्व पश्चिम रस्ते हॉटमिक्स गटारी सह सुधारणा करणे.	१०००००
१२.	सांगली वार्ड क्र.१४ क मधील सिध्दार्थ परिसर संजीवनी कांबळे ते किसन कुदळे ते गौतम लोंढे पेव्हींग ब्लॉक काढून काँक्रीटीकरण करणे.	६०००००
१३.	सांगली वार्ड क्र.१४ क मधील सिध्दार्थ परिसर कांबळे गल्ली येथीलपेव्हींग ब्लॉक काढून काँक्रीटीकरण करणे	३८३१००
१४.	सांगली वार्ड क्र. १४ क मधील सिध्दार्थ परिसर साखळकर बोळ काँक्रीटीकरण करणे	६०००००
१५.	सांगलीवॉर्ड क्र.१३ ब मधील समता चौक व एकता चौक परिसरातील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे.	१०००००
१६.	सांगलीवॉर्ड क्र.१५ मधील रमामातानगर परिसरातील रस्ते काँक्रीटीकरण करणे.	१५०००००
	एकूण र.रु.	**२,५७,८३,१००/-**

सूचक :- श्री. भारती दिगडे ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सांगली

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

D.P.Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५५६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजनेतून सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेला एकूण र.रु.१,७७,५५,८८४/- मात्र निधी मंजूर करण्यात आला असून, सदर मंजूर निधीतून सांगली हायस्कूल कंपौंड (देशपांडे घर) ते महापालिका आरोग्य केंद्र (झेंडा चौक) पर्यंतचा दक्षिण-उत्तर रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे अंदाजपत्रकीय र.रु.४० लक्ष मात्रची कामगिरीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली कडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. भारती दिगडे ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. धिरज सुर्यवंशी महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५५७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.मनपा-२०२३/प्र.क्र.८७-अ-३१(१)/नवि-१६ मंत्रालय मुंबई यांचेकडील दि.२८ मार्च २०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील शासन निर्णयातील नमुद अ.क्र.१ ते २४ कामांसाठी र.रु.३,१०,००,०००/- इतका निधी शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. तसेच, सदर शासन निर्णयातील विवरणपत्रातील अ.क्र.२ महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील कुपवाड येथील शांत कॉलनी येथील ओपन जागेवर कंपौंड बांधणे र.रु.१५.०० या कामास कार्यारंभ आदेस दिला नसल्यास सदर काम रद्द करुन त्याऐवजी कुपवाड येथील वॉर्ड क्र.२ मधील शांत कॉलनी येथील महानगरपालकेच्या खुल्या जागेवर सभागृह बांधणे र.रु.१५.०० लक्ष या कामास व सदर प्रकल्पांतर्गत कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका ऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग राहील असे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन शुद्धीपत्रक क्र.मनपा-२०२३/प्र.क्र.८७-अ-३१(१)/नवि-१६ मंत्रालय मुंबई यांचे दि.१० मे २०२३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार खालील नमुद २४ कामगिऱ्यांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रुपये
१.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ मधील रस्त्यावर पेव्हिंग ब्लॉक बसविणे व गटारी करणे	१०.००
२.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील कुपवाड येथील शांत कॉलनी येथील मनपा खुल्या जागेवर सभागृह बांधणे	१५.००
३.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील मिरज अस्वले कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे	१५.००
४.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.४ मधील मिरज इंदिरानगर येथील इंदिरा आवास योजनेतील इमारत मधील पावसाच्या पाण्याचा निचरा करणेसाठी कॉक्रिटीकरण करणे	१५.००
५.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.५ मधील मिरज लालबी टॉवर जवळ बोळात लादीकरण करणे	१०.००
६.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.७ मधील मिरज येथील विविध विकास कामे करणे	३०.००
७.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.८ मधील कुपवाड येथील विविध विकास कामे करणे	१५.००
८.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ मधील सांगली येथील शिंदे रेशन दुकान नाल्यापर्यंत रस्ता व गटार करणे	१०.००
९.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील सांगली मारुती मंदिर सुशोभिकरण करणे व सभा मंडप बांधणे	१०.००
१०.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील सांगली येथील मार्केट यार्ड कमान उलट बाजू ते कृष्णा यादव घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०.००

११.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.११ मधील सांगली येथील संजयनगर परिसरामध्ये रस्ते काँक्रिटीकरण करणे	१५.००
१२.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.११ मधील सांगली येथील चिंतामणीनगर परिसरात आर.सी.सी.गटार करणे	
१३.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१३ मधील सांगलीवाडी येथील प्रभाग क्र.१३ मध्ये विविध विकास कामे करणे	१५.००
१४.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ सांगली येथील कैकाडी गल्ली येथील रस्ता डांबरीकरण करणे	१०.००
१५.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ सांगली येथील गुरुनाथ कुलकर्णी घर ते झुंझार चौक ते नवभारत चौक गावभाग मधील दरनोबत गल्ली अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे	१५.००
१६.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ सांगली येथील अंतर्गत बोळ काँक्रिटीकरण करणे व विष्णूघाट येथील घाट बांधणे	१०.००
१७.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१५ सांगली येथील अनंत गंगाभवन ते सर्वधर्म चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे	१०.००
१८.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१५ सांगली मधील फौजदार गल्ली येथील अंतर्गत गटार बांधकाम करणे	१०.००
१९.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१५ सांगली येथील गणेशनगर व रमामातानगर अंतर्गत आर.सी.सी.गटर करणे	१०.००
२०.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१६ सांगली येथील विठ्ठलनगर मंदिर मागील झांबरे बोळ व शितोळे बोळ काँक्रिटीकरण करणे	१०.००
२१.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१६ सांगली येथील विविध विकास कामे करणे	१०.००
२२.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१७ सांगली दत्तनगर परिसरातील अंतर्गत रस्ते करणे	१५.००
२३.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१९ सांगली येथील राजू धुळशेट्टी यांचे घर ते कुंभार यांचे घरासमोर व शुळकर काका घरा समोरील रस्ता डांबरीकरण करणे	१५.००
२४.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२० सांगली येथील कृष्णाघाट मठीत वाचनालय (लायब्ररी) बांधणे	२५.००

सूचक :- श्री. शेडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

अनुमोदक :- श्री. विष्णू माने

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५५८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.४२५ दि.१७/०२/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत मिरज व कुपवाड शहरातील २९४ विकास कामांचा र.रु.७९,२१,५०,०००/- मात्रचा प्रस्ताव दि.२१ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मा.महाराष्ट्र शासनाकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी पाठविणेत आलेला असून, सदरचा निधी ७०% शासन व ३०% मनपा असा मंजूर होणार असून, त्यानुसार महापालिकेचा ३०% हिस्सा भरणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडून तयार करण्यात आलेल्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत तयार केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद असलेली कामे सदर योजनेसाठी असलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.-एन यु आर २०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३, दि.०८/११/२०१० मधील परिच्छेद क्र.-२ अभियाना अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी दिलेल्या निर्देशानुसार लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित केले असून सदर क्षेत्रातील कामास अर्थसहाय्य मिळणे करीता सुधारणा कार्यक्रमाच्या दृष्टीने महानगरपालिकेने खालील प्रमाणे कार्यवाही ठेवली आहे.

अ. क्र.	सुधार कार्यक्रम	सद्यस्थिती	पुर्ण करण्याचा कालावधी
१.	व्दिनोंद लेखापध्दतीचा अवलंब करणे	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
२.	महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे.	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
३.	मालमत्ता करविषयक सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
४.	उचीत उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
५.	गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतुद करणे.	तरतुद करणेत आली आहे.	-

सदर नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत या महानगरपालिकेस प्रकल्प किंमतीच्या ७०% अनुदान व ३०% महानगरपालिका हिस्सा अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे प्रकल्प राबविणे करीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना (जिल्हास्तर) महानगरपालिका हिस्सा यासाठी आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणेस महापालिका तयार आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५५९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक –मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(१७४(०६))/ नवि.-१६ मंत्रालय मुबई यांचे दि.२३ डिसेंबर २०२२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाची विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकरिता र.रु.५०,००,०००/- इतका निधी शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पांतर्गत कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका राहील त्यानुसार खालील नमुद ०५ कामगिऱ्यांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामांचे नाव	रक्कम रुपये
१.	भारत नगर मिरज येथील श्री.दत्त मंदिरासमोर सभा मंडप बांधणे	१०.००
२.	प्रभाग क्र.१८ मधील अब्दुल कलाम नगर शामराव नगर मधील असिफ पटेल ते इरन्ना कोळीवाड पर्यत रस्ता तयार करणे	१०.००
३.	प्रभाग क्र.१८ मधील शामरावनगर येथील हेरवाडे किराणा दुकान समोरचे चिन्मय लॉन शेजारी रस्ता ते नागेश भोकरे यांच्या चिरमुरे भट्टी पर्यतचा रस्ता करणे	१०.००
४.	प्रभाग क्र.१ मधील गोमटेश नगर गल्ली क्र.२ मधील लहू पवार यांच्या घराशेजारील सुधारणा करणे	१०.००
५.	प्रभाग क्र.१ मधील गोमटेश नगर गल्ली क्र.१ मधील शंकर कारंडे यांचे घरासमोरील खुल्या जागेचा महिलांसाठी विकास करणे	१०.००

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड रोड लक्ष्मी मंदिर चौकामध्ये वाहतुक व्यवस्था सुरळीत करणेकामी सिग्नल यंत्रणा उभारणी करणे अंदाजपत्रकीय र.रु.१२,८१,०८२/- मात्रचे कामी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व सदर कामी नगरोत्थान महाअभियान, नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना, मुलभूत सोईसुविधांचा विकास किंवा अन्य कोणत्याही शासकीय निधीतून निधी मिळणेस प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.पद्मश्री पाटील

D.P. Suryavarshi.
महापौर,

महानगरपालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५६०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज मार्ग हा रस्ता महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्ता असून, सदर रस्त्याची लांबी ३८२० इतकी आहे. सदर रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा असून, या मार्गावरुन शहरा बाहेर जाणारी अवजड वाहने जात असतात. मागील दोन-तीन वर्षामध्ये झालेली अतिवृष्टी व महापुर यामुळे सदर रस्त्याची दुरावस्था झालेली असून, सदर रस्त्याची सुधारणा तातडीने करणे आवश्यक आहे.

सदर रस्ता सुधारणा करणेकामी भौगोलिक सर्व्हेक्षण आणि माती परिक्षण तसेच ड्रेनेज सर्व्हे, इलेक्ट्रीक सर्व्हे, गॅस पाईप लाईन सर्व्हे, स्टॉर्मवॉटर सर्व्हे, ट्रॅफिक सर्व्हे महापालिकेकडून करणेत आलेला असून, सदर रस्ता सुधारणा करणेकामी महापालिका पॅनेल वरील वास्तुविशारद पिनाका कन्सलटन्सी यांचेकडून र.रु.८०,४८,९३,१४८/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. त्यामध्ये चार पदरी कॉंक्रिट रस्ता, दोन पदरी डांबरी रस्ता, दोन्ही बाजूस फुटपाथ, दीड मिटर रुंदीचे फ्लॉवर बेडसह डिव्हायडर, ठिकठिकाणी स्वच्छता गृहे, सात ठिकाणी पोलीस कीओस्क, सात चौकामध्ये सी.सी.टीव्ही यंत्रणा व सिग्नल यंत्रणा ज्यामध्ये एल ई डी स्क्रिन व साईन बोर्ड, वायर फेन्सींग, पार्किंग व्यवस्था, हायब्रिड सोलर स्ट्रीट लाईन, रोड फर्निचर, युटीलिटी डक्ट ,स्टॉर्मवॉटर गटर याचा समावेश आहे.

सद्य स्थितीत महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने, महापालिकेकडून सदर कामासाठी तरतुद उपलब्ध नसलेने व नागरिकांच्या सोईसाठी सदर रस्त्याची सुधारणा तातडीने करणे आवश्यक आहे. यासाठी सदर कामी ३०% प्रमाणे लागणाऱ्या मनपा हिस्साची तरतुद करणेस महापालिका तयार असून, सदर रस्त्यासाठी लागणारा निधी नगरविकास विभागाकडील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (राज्यस्तर) अंतर्गत निधीतून मंजूर होणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील. D. I. Suryavanshi महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- २०/०६/२०२३

ठराव क्रमांक :- ५६१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र लक्ष्मण कुंभार, कु.सोनाली विलास सागरे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.४३ दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड प्रभाग क्र.८ मधील स.नं.१० क्षेत्र २४.६१ आर या मनपा मालकीच्या खुल्या भूखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने स्मारक उभारुन सुसज्ज वाचनालय निर्माण करणेस मान्यता देणेत आलेली होती. तद्नंतर मा.महासभा ठराव ४६ दि.१८/०९/२०२० अन्वये कुपवाड प्रभाग क्र.८ मधील स.नं१० क्षेत्र २४.६१ आर या ठिकाणी सुसज्ज वाचनालय,उद्यान विकसीत करणेकामी नकाशा,आराखडा व अंदाजपत्रक तयार करणेसाठी वास्तुविशारद एस.पी. तायवडे-पाटील यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत आलेली होती. सदर ठिकाणी स्मारक उभारणेस तांत्रिक अडचण निर्माण झालेने, सदरचे दोन्ही ठराव रद्द करणेत येत असून, कुपवाड प्रभाग क्र.८ मधील वानलेसवाडी स.नं.२७/१/२/अ/३ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोसायटी मधील खुल्या जागेवरील जुने व धोकादायक सांस्कृतिक भवन पाडून, सदर ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने सुसज्ज वाचनालय व अभ्यासिका निर्माण करणेस व त्याकामी नकाशा,आराखडा व अंदाजपत्रक तयार करणेसाठी महापालिका पॅनेल वरील वास्तुविशारद यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.राजेंद्र कुंभार ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- कु.सोनाली सागरे

D.P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका